*एमआयटीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन अभिनेत्री शर्वरी जमेनीस यांच्या हस्ते झाले. यावेळी अजित आपटे, प्रा.नूतन पाठक, डॉ.एल. के. क्षीरसागर, बंडा जोशी, डॉ.विश्वनाथ कराड आदी उपस्थित होते.*

## वक्तृत्व हा अभिव्यक्तीचा महत्वाचा प्रकार : शर्वरी जमेनीस

वक्तृत्व हा अभिव्यक्तीचा एक महत्वाचा प्रकार आहे. तारूण्याचा काळ फार मोलाचा असतो. वक्तृत्वासारख्या कलेची जोपासना करून त्याचे सोनेरी क्षण आपल्या हृदयात जपून ठेवा, असे अभिनेत्री शर्वरी जमेनिस यांनी सांगितले. त्या माईर्स एमआयटी तर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्य स्तरावरील वकृत्व स्पर्धेची उद्घाटनीप्रसंगी बोलत होत्या. यावेळी एमआयटीचे संस्थापक संचालक डॉ.विश्वनाथ कराड, अजित आपटे, प्रा.नूतन पाठक, डॉ.एल.के.क्षीरसागर, बंडा जोशी आदी उपस्थित होते. कोणत्याही क्षेत्रात प्रगती करावयाची असल्यास व्यक्तिमत्व विकसित करणे महत्वाचे असते, असे डॉ.कराड म्हणाले. प्रास्तविक प्रा.नूतन पाठक यांनी केले. प्राचार्य डॉ.एल.के.क्षीरसागर यांनी आभार मानले.